

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड जि. नांदेड

# राष्ट्रीय सेवा योजना अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५

मार्गदर्शक

डॉ. ए.टी.शिंदे

प्राचार्य

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड जि.नांदेड.


सादरकर्ते

प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार

कार्यक्रम अधिकारी रा.से.यो.

राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड जि.नांदेड.

बुधवार १० एप्रिल २०२४

## राजीव गांधी महाविद्यालयात मतदान जागृती अभियान संपन्न

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय येथे मुदखेड तहसील आणि राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 मतदान जागृती अभियान बुधवार १० एप्रिल २०२४ रोजी राबवण्यात आले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते अध्यक्षस्थानी होते. या वेळी विचारपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून भोकर उपविभागीय अधिकारी मा.श्री.प्रवीण मेघशेट्टी आणि मुदखेड येथील तहसीलदार मा.श्री. आनंद देऊळगावकर, गट शिक्षण अधिकारी मा.श्री. सुरेश पाटील, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार हे उपस्थित होते.

यावेळी भोकर उपविभागीय दंडाधिकारी मा श्री प्रवीण मेघशेट्टी यांनी सर्व मतदार बंधू व भगिनी नवतरुण विद्यार्थ्यांनी मतदान प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदवून राष्ट्र मजबूत करावे ही अपेक्षा व्यक्त केली. यावेळी तहसीलदार मा.श्री.आनंद देऊळगावकर यांनी आपल्या मनोगतामध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले , ज्या विद्यार्थ्यांचे वय 18 वर्ष पूर्ण झाले अशा विद्यार्थ्यांनी सुद्धा नाव नोंदणी करता येते.नाव नोंदणी यंत्रणा अतिशय सुलभ आणि सोपी असून या प्रक्रियेचा सर्वांनी लाभ घ्यावा असे प्रतिपादन केले. यावेळी अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांनी घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रत्येकाला मतदानाचा अधिकार दिला आहे, या पवित्र मतदानाचा राष्ट्र निर्मितीसाठी व लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी सर्वांनी मतदान करावे असे स्पष्ट प्रतिपादन केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. दत्ताजी मेहत्रे यांनी केले ,तर आभार राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.आर.बी. कोटलवार यांनी मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक ,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते. या वेळी विचारपीठावर भोकर उपविभागीय अधिकारी मा.श्री.प्रवीण मेघशेट्टी आणि मुदखेड येथील तहसीलदार मा.श्री. आनंद देऊळगावकर, गट शिक्षण अधिकारी मा.श्री. सुरेश पाटील, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार.




## रविवार दि. १४ एप्रिल २०२४

### राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 133 वी जयंती निमित्त रविवार दि. १४ एप्रिल २०२४ महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डाॅ.माधव बसवंते यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. सदाशिव भुयारे यांचे व्याख्यान संपन्न झाले

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते हे होते. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतातील सामाजिक व आर्थिक परिवर्तनातील योगदान' या विषयाची मांडणी करताना डॉ. आंबेडकरांचे संविधान निर्मितीतील भूमिका, धर्मासंबंधीचे विचार, आर्थिक विकेंद्रीकरणाबरोबर डॉ. आंबेडकरांचे वितरणात्मक न्यायाची भूमिका त्यांनी सविस्तर स्पष्ट करून आर्थिक समतेशिवाय सामाजिक आणि राजकीय समता प्रस्थापित होऊ शकत नाही असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. व्याख्यानाच्या विचारपीठावर राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. आर. बी. कोटलवार व राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. डी एच मेहत्रे हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रा. डॉ. मयूर दरवेशवार यांनी केले.कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बुधवार २६ जून २०२४





छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंती निमित्ताने प्रतिमा पूजन करताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार आणि महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी

बुधवार दिनांक 14 ऑगस्ट 2024

राजीव गांधी महाविद्यालयांमध्ये हर घर तिरंगा अभियानांतर्गत रॅलीचे आयोजन.

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी नांदेड संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने " हर घर तिरंगा " अभियान अंतर्गत बुधवार दिनांक 14 ऑगस्ट 2024 रोजी सकाळी 11 वाजता महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांच्या मार्गदर्शनाखाली रॅलीचे यशस्वी आयोजन आणि नियोजन करण्यात आले.

महाविद्यालयातून निघालेल्या या तिरंगा रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. रॅलीमध्ये विविध देशभक्तीच्या घोषणा देऊन सुरुवात करण्यात आली. मुदखेड येथील मुख्य रस्त्यावरून रॅली काढण्यात आली. महाराष्ट्राचे उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या मार्गदर्शनानुसार आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड , राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या सूचनेनुसार हर घर तिरंगा हे अभियान राबविण्यात आले.

तिरंगा रॅली यशस्वी करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार , श्री दत्ता इंगोले ,श्री मुकुंद डांगे, नारायण पवार यांनी विशेष मेहनत घेतली. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.







" हर घर तिरंगा " अभियान अंतर्गत महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव वसवंते, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार आणि महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी

गुरुवार दि.१५/०८/२०२४

## राजीव गांधी महाविद्यालयात स्वातंत्र्यदिनानिमित्ताने झेंडावंदन

गुरुवार दि.१५/०८/२०२४ रोजी राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे स्वातंत्र्यदिनानिमित्ताने ध्वजारोहण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव वसवंते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी प्र.प्राचार्य डॉ. माधव वसवंते यांनी आपल्या शुभेच्छा संदेशामध्ये मनोगत व्यक्त करताना म्हणाले देशाचे स्वातंत्र्य हे अनेक वलिदानातून मिळालेले आहे. देशातील गोरगरीब, शेतकरी, मजूर, दिनदलित लोकांसाठीया या स्वातंत्र्याचा उपयोग झाला पाहिजे. असे प्रतिपादन केले.




ध्वजारोहण करताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव वसवंते



15 ऑगस्ट स्वातंत्र्य दिन निमित्ताने महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य डॉक्टर माधव वसवंत, प्राध्यापक व शिक्षिकेतील कर्मचारी



प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. वी. कोटलवार आणि महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी

## गुरुवार दि.२३ जानेवारी २०२५

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे योजनेच्या वतीने गुरुवार दिनांक २३ जानेवारी २०२५ रोजी नेताजी सुभापचंद्र बोस आझाद यांच्या जयंती निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून झाले. यावेळी हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विजयसिंह ठाकूर यांनी नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या जीवन व कार्यावर व्याख्यान दिले. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर.वी. कोटलवार यांनी केले आभार प्रा. डॉ. मारोती देशमुख यांनी मानले.



नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या जीवन व कार्यावर व्याख्यान देताना हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विजयसिंह ठाकूर या वेळी प्र.प्राचार्य डॉ. माधव बसवंते



लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय धर्माबाद येथे युवक युवती नेतृत्व विकास शिबिरामध्ये मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. आर. बी. कोटलवार

मंगळवार दि. 20 ऑगस्ट 2024

## राजीव गांधी महाविद्यालयात सद्भावना दिन साजरा

मंगळवार दि. 20 ऑगस्ट 2024 रोजी सकाळी 11.00 वाजता महाविद्यालय प्रांगणात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय राजीव गांधी यांच्या जयंती निमित्ताने 'सद्भावना दिवसाचे' आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव वसवंते यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. महाविद्यालयातील बी.ए, बी.कॉम., बीएस.सी शाखेच्या प्रथम, द्वितीय. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनि सहभाग नोदवला.




स्वर्गीय राजीव गांधी यांच्या जयंती निमित्ताने 'सद्भावना दिवसाचे' आयोजन, महाविद्यालयातील प्रा. डॉ. राहुल धावारे, प्रा. डॉ संदीप कोरडे, श्री अंकुश डोंगरे

१२ जानेवारी २०२५

## राजीव गांधी महाविद्यालयांमध्ये राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवरायांना ज्ञान ,चारित्र्य ,चातुर्य ,संघटन व पराक्रम अशा राजस व सत्वगुणांचे बाळकडू देणाऱ्या राजमाता जिजाऊ आणि जीवनात जोखीम पत्करा, जिंकलात तर नेतृत्व कराल, हरलात तर इतरांना मार्ग दाखवाल असे सांगणारे स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांनी प्रथमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी कोटलवार, नॅक समन्वयक प्रा. डॉ. राहुल धावारे , प्रा. डॉ. दत्ता मेहत्रे,प्रा. प्रकाश कोथळे, प्रा. डॉ. उत्तम जायभाये,प्रा. डॉ. मोकले, प्रा. डॉ. मयूर दरबेसवार , प्रा. डॉ. शिवराज कदम, प्रा. डॉ. मारोती देशमुख,प्रा. सुलोचना माळवे, ग्रंथपाल प्रा. नंदा करंजकर, प्रा. डॉ. व्ही. सी. ठाकूर, प्रा. सदाशिव भुयारे, कार्यालय प्रमुख श्री अंकुश डोंगरे, महंमद फसी, दिलीप डहाळे, शंकर हिवराळे, डी.सी. इंगोले इत्यादी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक तथा राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी कोटलवार, नॅक समन्वयक प्रा. डॉ. राहुल धावारे ,प्रा. प्रकाश कोथळे, डॉ. शिवराज कदम, प्रा. सुलोचना माळवे,

२८ सेप्टेंबर २०२४ .



वृक्षारोपण करताना महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवक

शनिवार दि८ सेप्टेंबर २०२४
महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त स्वच्छता अभियान

शनिवार दिनांक 28 सप्टेंबर 2024 रोजी सकाळी 11 वाजता महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉक्टर माधव बसवंत यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय परिसरामध्ये स्वच्छता अभियान राववण्यात आले या अभियानामध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी सहभाग नोंदवला. या स्वच्छता अभियानामध्ये महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी दिलीप डहाळे, मुकुंद डांगे, परमेश्वर मुंगल, संदीप गाडे यांनी विशेष मेहनत घेतली.



महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंत यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय परिसरामध्ये स्वच्छता अभियान राववण्यात आले या अभियानामध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी विद्यार्थिनी.
राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. वी कोटलवार



## राजीव गांधी महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी.

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती तर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथीचा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला.

यावेळी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. दत्ताजी मेहत्रे,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर.बी. कोटलवार, हिंदी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विजयसिंह ठाकूर कार्यालयीन प्रमुख श्री अंकुश डोंगरे हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. आर.बी. कोटलवार यांनी केले तर आभार प्रा. डॉ. संदीप कोरडे यांनी मानले.

या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**राजीव गांधी महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न.**

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे महाराष्ट्र ग्रामीण बँक वर्धापन दिन निमित्ताने वृक्षारोपण करण्यात आले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शाखा अधिकारी सोमेश वनवे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले यावेळी बँकेचे कर्मचारी कॅशियर राजकुमार रुद्रवार ,तुषार यादव , सुदर्शन मुंगल , सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. दत्ता मेहत्रे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार, श्री दत्ता इंगोले ,श्री मुकुंद डांगे ,श्री जे.टी. विश्वब्रमे इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.



महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी शाखा अधिकारी सोमेश वनवे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले यावेळी बँकेचे कर्मचारी कॅशियर राजकुमार रुद्रवार ,तुपार यादव , सुदर्शन मुंगल , सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. दत्ता मेहत्रे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार, श्री दत्ता इंगोले ,श्री मुकुंद डांगे ,श्री जे.टी. विश्वब्रमे इत्यादी





महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण

## मंगळवार १५ ऑक्टोबर २०२४

**राजीव गांधी महाविद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिन साजरा.**

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे मंगळवार १५ ऑक्टोबर२०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रंथालय यांच्या संयुक्त विद्यमान व्याख्यानाचे व पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते होते, तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. जी. एस. भोपाळकर ,सहयोगी प्राध्यापक, इंदिरा गांधी महाविद्यालय नांदेड आणि प्रा. डॉ. शिवराज कदम अर्थशास्त्र विभाग राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड हे उपस्थित होते.

यावेळी आपले मार्गदर्शन करताना प्रा. भोपाळकर यांनी भारताचे माजी राष्ट्रपती स्व.डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी देशासाठी केलेल्या योगदानाबद्दल सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी त्यांची प्रेरणा घेऊन ऊतुंग यश संपादित करावे असे प्रतिपादन केले. यावेळी अध्यक्षीय समारोपामध्ये प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांनी आपले विचार मांडताना

म्हणाले की ,विद्यार्थ्यांनी वाचण्याची आवड निर्माण करून सर्वांगीण विकास करून घ्यावा. हा काळ स्पर्धात्मक असल्यामुळे विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांचे वाचन करावे.आयुष्यात यश मिळवण्यासाठी पुस्तक हे अतिशय महत्त्वाचा आहे असे प्रतिपादन केले. प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करतांना डॉ शिवराज कदम म्हणाले की,पुस्तके हे चांगले मित्र असतात.पुस्तकांमुळे ज्ञान मिळते,व्यक्तिमत्व विकास होतो.त्यामुळे विद्यार्थ्यांनी वाचनाची आवड जोपासावी असेही त्यांनी सांगितले.

यावेळी ग्रंथालयात आलेल्या नवीन पुस्तकाचे प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले .यामध्ये प्रामुख्याने स्पर्धा परीक्षेची पुस्तके, विविध संदर्भ बुक, विविध आत्मचरित्र, विविध थोरा मोठ्यांची पुस्तके विद्यार्थ्यांसाठी या प्रदर्शनात दाखवली गेली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजयसिंह ठाकुर यांनी केले ,तर प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, विद्यार्थी ,विद्यार्थिनी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. आर.बी. कोटलवार, प्रा. डॉ. विजयसिंह ठाकूर, प्रा. डॉ. नंदा करंजकर, श्रीयुत देशमुख ,श्री परमेश्वर मुंगल यांनी विशेष मेहनत घेतली.



श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड जि. नांदेड

**राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने भारताचे माजी स्वर्गीय राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने 'वाचन प्रेरणा दिन' व्याखान कार्यक्रम**

विषय - वाचन संस्कृती आणि व्यक्तिमत्व विकास

मंगळवार दि.१५ ऑक्टोबर २०२४ स .११.०० वा.

**अध्यक्ष - प्र.प्राचार्य डॉ. माधव बसवंते**

**प्रमुख वक्ते - प्रा.डॉ. जी. एस.भोपाळकर**

रसायनशास्त्र विभाग,इंदिरा गांधी वरिष्ठ महाविद्यालय, सिडको, नांदेड.

**प्रा. डॉ. शिवराज कदम**

अर्थशास्त्र विभाग,राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड.जि. नांदेड

विनीत

**प्रा. डॉ. आर.बी. कोटलवार** कार्यक्रम अधिकारी,तथा समन्वयक, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष

स्थळ- ICT हॉल, राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड जि. नांदेड




डॉ. .ए.पी.जे. अव्दुल कलाम यांना अभिवादन करताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते, प्रा. डॉ. अर.वी. कोटलवार, प्रा. डॉ. भोपाळकर, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी



वाचन प्रेरणा दिन निमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन करताना प्रभारी प्राचार्य डॉ.माधव बसवंते, ग्रंथपाल प्राध्यापक डॉक्टर नंदा करंजकर इत्यादी









मार्गदर्शन करताना प्रा. भोपाळकर, या वेळी विचारपिठावर प्र प्राचार्य डॉ.माधव बसवंते, प्रा. डॉ. शिवराज कदम,डॉ.आरबी.कोटलवार व विद्यार्थी



मार्गदर्शन करताना प्र. प्राचार्य डॉ.माधव बसवंते, प्रा. डॉ. शिवराज कदम,डॉ.आरबी.कोटलवार



डॉ.आरबी.कोटलवार

रमाबाई आंबेडकर यांना अभिवादन



रमाबाई आंबेडकर यांना अभिवादन करताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉक्टर माधव बसवंते कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉक्टर अरबी कोटलवार प्राध्यापक डॉक्टर संदीप कोरडे श्री अंकुश डोंगरे महंमद फसी



माय भारत

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड जि. नांदेड

Diwali with My Bharat – Ye Diwali My Bharat Wali

27th to 30 October 2024

1. बाजार परिसरात स्वच्छता मोहीम

2. वाहतूक पोलिसांच्या सहकार्याने वाहतूक व्यवस्थापन

3. सेवा से सीखे रुग्णालयात अनुभवात्मक शिक्षण

| | |
|---|---|
| **डॉ. माधव बसवंते**<br>प्र.प्राचार्य<br>राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड जि. नांदेड | **प्रा. डॉ. आर.बी. कोटलवार**<br>कार्यक्रम अधिकारी,<br>राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड जि. नांदेड |

शुक्रवार २५ ऑक्टोबर२०२४

**राजीव गांधी महाविद्यालयात मतदार जनजागृती कार्यक्रम व शपथ दान समारंभ संपन्न**

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे शुक्रवार २५ ऑक्टोबर२०२४ राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने मतदार जनजागृती कार्यक्रम आणि शपथदान समारंभ घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्व सांगण्यात आले.

मतदान जनजागृतीसाठी समाजामध्ये जाऊन प्रचार व प्रसार करण्याचे महत्व ही विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. याप्रसंगी मतदान करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे या भूमिकेतून प्रत्येक मतदाराने मतदान करण्याची शपथ घ्यावी व आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे या उद्देशातून उपस्थित सर्व स्वयंसेवक विद्यार्थ्यांना मतदान जनजागृती संबंधीची शपथ देण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. आर.बी.कोटलवार ,डॉ. दत्ताजी मेहत्रे ,डॉ. राहुल धावारे, डॉ. विजयसिंह ठाकूर यांनी परिश्रम घेतले.या कार्यक्रमास विद्यार्थी,प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते


Shri Sharda Bhavan Education Society's
Rajiv Gandhi Mahavidyalaya,
Mudkhed, Dist. Nanded.
NAAC Accredited With 'B' Grade
(Affiliated to Swami Ramanand Teerth Marathwada University, Nanded.)
Organised
A Guest Lecture on Women's Rights
Committee
Convener



दैनिक

# सत्यप्रभा

## मतदार जनजागृती कार्यक्रम व शपथ दान समारंभ संपन्न

मुदखेड दि २५ (वा.प्र.)- येथील श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने मतदार जनजागृती कार्यक्रम आणि शपथदान समारंभ घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्व सांगण्यात आले.



मतदान जनजागृतीसाठी समाजामध्ये जाऊन प्रचार व प्रसार करण्याचे महत्व ही विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. याप्रसंगी मतदान करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. या भूमिकेतून प्रत्येक मतदाराने मतदान करण्याची शपथ घ्यावी व आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे या उद्देशातून उपस्थित सर्व स्वयंसेवक विद्यार्थ्यांना मतदान जनजागृती संबंधीची शपथ देण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. आर.बी. कोटलवार, डॉ. दत्ताजी मेहत्रे, डॉ. राहुल धावारे, डॉ. विजयसिंह ठाकूर यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

मुख्य संस्करण
26 अक्तूबर, 2024 पृष्ठ सं.3
संचालित: Way2smart

## राजीव गांधी महाविद्यालयात मतदार जनजागृती कार्यक्रम



**मुदखेड :** येथील श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने मतदार जनजागृती कार्यक्रम आणि शपथदान समारंभ घेण्यात आला. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्व सांगण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. आर.बी. कोटलवार, डॉ. दत्ताजी मेहत्रे, डॉ. राहुल धावारे, डॉ. विजयसिंह ठाकूर यांनी परिश्रम घेतले.

गुरुवार ०५ सप्टेंबर २०२४



## मंगळवार १७ सप्टेंबर २०२४

मंगळवार १७ सप्टेंबर २०२४ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिन साजरा करण्यात आला महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉक्टर माधव बसवंते यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





मंगळवार २६/११/२०२४

**राजीव गांधी महाविद्यालयात भारताचे संविधान दिन साजरा**

मुदखेड दि : येथील श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, सांस्कृतिक विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवार २६/११/२०२४ रोजी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डाॅ.माधव बसवंते यांच्या अध्यक्षतेखाली संविधान दिन साजरा करण्यात आला.राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डाॅ.आर.बी.कोटलवार यांनी संविधान उद्देशिकेचे वाचन करून उपस्थितांना सामूहिक शपथ दिली.

यावेळी राज्यशास्त्र विभागप्रमुख डाॅ.डी.एच.मेहत्रे यांनी आपल्या प्रास्ताविकातून संविधान निर्मितीचा घटनाक्रम व संविधानाचे महत्व स्पष्ट केले. प्रा. डॉ. शशिकांत तोळमारे यांनी संविधान निर्मितीचा संक्षिप्त इतिहास विषद केला. उपस्थित होते. अध्यक्षीय समारोप करतांना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांनी म्हणाले की, भारतीय संविधानाची उद्देशिका ही संविधानाचा प्राणच आहे. भारतीय लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक भारतीयांनी संविधानिक मूल्यांचे आचरण करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

कार्यक्रमास प्रा.मुंगल,श्री. दिलीप डहाळे,यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.





गुरुवार दि.२८ नोव्हेंबर २०२४

# राजीव गांधी महाविद्यालयांमध्ये सत्यशोधक महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन.

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने गुरुवार दि.२८ नोवेंबर २०२४ सत्यशोधक क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना पुण्यतिथी निमित्ताने महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांच्या हस्ते प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले.

अभिवादनप्रसंगी प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांनी तळागाळातील लोकांसाठी आपले आयुष्य समर्पित केले असून त्यांचे हे कार्य आपल्यासाठी ऐतिहासिक व प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन केले.

या अभिवादन कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक ,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमअधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार यांनी केले ,तर आभार प्रा. डॉ. दत्ताजी मेहेत्रे यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी दिलीप डहाळे व मुकुंद डांगे यांनी सहकार्य केले.



# राजीव गांधी महाविद्यालयामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन



नांदेड,दि.२८-श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सत्यशोधक क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना पुण्यतिथी निमित्ताने अभिवादन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.

यावेळी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांनी तळागाळातील लोकांसाठी मोठे कार्य केलेले आहे. त्यांचे कार्य हे आपल्यासाठी प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन केले.

यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार यांनी केले तर आभार प्रा. डॉ. दत्ता मेहेत्रे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी दिलीप ढहाळे मुकुंद डांगे यांनी मोलाचे सहकार्य केले.

दैनिक सत्यप्रभा

## मतदार जनजागृती कार्यक्रम व शपथ दान समारंभ संपन्न

मुदखेड दि २५ (ता.प्र.)- येथील श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने मतदार जनजागृती कार्यक्रम आणि शपथदान समारंभ घेण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते आणि कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार यांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्व सांगण्यात आले.



मतदान जनजागृतीसाठी समाजामध्ये जाऊन प्रचार व प्रसार करण्याचे महत्व ही विद्यार्थ्यांना पटवून देण्यात आले. आपण सर्वांनी मतदान करणे हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. या भूमिकेतून प्रत्येक मतदाराने मतदान करण्याची शपथ घ्यावी व आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे या उद्देशातून उपस्थित सर्व स्वयंसेवक विद्यार्थ्यांना मतदान जनजागृती संबंधीची शपथ देण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. आर.बी. कोटलवार, डॉ. दत्ताजी मेहत्रे, डॉ. राहुल धावारे, डॉ. विजयसिंह ठाकूर यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

मुख्य संस्करण
26 अक्तूबर, 2024 पृष्ठ सं.3
संचालित: Way2smart

शुक्रवार दि ०६/१२/२०२४

**राजीव गांधी महाविद्यालयात महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन**

मुदखेड दि : येथील श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे शुक्रवार दि ०६/१२/२०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्ताने अभिवादनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी महामानव भारतरत्न डाॅ बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनाच्या निमित्ताने दैनिक प्रजावाणीत डॉ माधव बसवंते लिखित " मीच आंबेडकर आहे!" ही प्रकाशित झालेली कविता प्रा. डॉ. संदीप कोरडे यांनी वाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. आर.बी.कोटलवार यांनी केले. आभार प्रा. डॉ. हनुमंते यांनी मानले.या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी संख्येने उपस्थित होते.




शुक्रवार २३ फेबुवारी २०२४

## राजीव गांधी महाविद्यालयात शिवजयंती साजरी

मुदखेड, राजीव गांधी महाविद्यालय येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागा आणि सांस्कृतिक विभागाच्या वतीने शिवजयंती साजरी झाली.कार्यक्रमासाठी प्रमुखवक्तेम्हणून श्री संतोष देवराये(सहशिक्षक, महात्मा फुले हायस्कूल विजयनगर नांदेड) उपस्थित होते.कार्यक्रमाचे

अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते व प्रमुख उपस्थितीत ईश्वर पिन्नरवार उपस्थित होते.छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवन चरित्र व त्यांचे विविध पैलू या विषयाची मांडणी करताना प्रमुख वक्ते संतोष देवराय यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंग सांगून  मनोरंजनात्मक प्रबोधन केले.शिवाजी महाराजांचे नेतृत्व गुण संघटन कौशल्य धर्मनिरपेक्षता सामाजिक बांधिलकी आणि सामाजिक समन्वय ही गुण विद्यार्थ्यांनी आत्मसात केले पाहिजे असा मोलाच सल्ला विद्यार्थ्यांना दिला.अध्यक्ष समारोप करताना डॉ. माधव बसवंते यांनी शिवाजी महाराजांचे गड, किल्ले त्यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

कार्यक्रमाची सुरुवात कु. मयुरी थोरात आणि कु.अमिषा कल्याणकर यांच्या स्वागत गीताने झाली. कुमारी गायत्री पांचाळ, दिपाली अवुलवार, श्री संभाजी कदम या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक, संयोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी. एच. मेहत्रे यांनी केले.कार्यक्रंमाचे सूत्रसंचालन डॉ. आर पी धावारे तर आभार अर्जुनसिंह ठाकूर यांनी केले. कार्यक्रमासाठी अनेक विद्यार्थी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.




| | |
|---|---|
| विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रमुख वक्ते संतोष देवराये आणि व्यासपीठावर प्राध्यापक डॉ. डी. एच. मेहत्रे, प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते, पत्रकार ईश्वर पिन्नरवार | विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रभारी प्राचार्य डॉ.माधव बसवंते व्यासपीठावर डॉ.डी एच मेहत्रे प्रमुख वक्ते संतोष देवराये, पत्रकार पिनलवार |

# भारतीय राज्यघटनेच्या 75 वर्ष पूर्ती निमित्त संविधान गौरव महोत्सव

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारतीय राजकीय घटनेच्या ७५ वर्ष पूर्ती निमित्त 'संविधान गौरव महोत्सव' अंतर्गत फेब्रुवारी २०२५ मध्ये विविध कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रामुख्याने भारतीय राज्यघटनेवर ऑनलाईन प्रश्नमंजुषा, आणि भारतीय राज्यघटनेची ओळख या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले .

१. भारतीय राज्यघटनेवर ऑनलाईन प्रश्नमंजुषा

२. भारतीय राज्यघटनेवर मान्यवरांचे व्याख्यान

३. भारतीय राज्यघटनेवर निबंध स्पर्धा

४. भारतीय राज्यघटना जनजागृती – भित्तीपत्रक

१ .भारतीय राज्यघटनेवर ऑनलाईन प्रश्नमंजुषा

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली online प्रश्नमंजुषाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने एकूण 25 बहुपर्यायी प्रश्न विद्यार्थ्यांना देण्यात आली. या परीक्षेसाठी राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ.दत्ताजी मेहत्रे, प्रा. ऋषिकेश मुंगल, श्री. डी.सी. इंगोले आणि शंकर हिवराळे यांचे सहकार्य लाभले. या प्रश्नमंजुषामध्ये महाविद्यालयातील ४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

दिनांक १२ मार्च २०२५ रोजी मोठ्या समारंभामध्ये यशस्वी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. मुदखेड येथील नायब तहसीलदार स्वप्निल जगताप हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारणी सदस्य पांडुरंग पावडे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या स्पर्धेत प्रथम गायत्री पांचाळ कालिदास, द्वितीय वाघमारे शिवा, तृतीय अनिकेत मुंजाजी कळणे यांनी यश संपादन केले. प्रमाणपत्र वितरणाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ. आर.बी. कोटलवार यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. दत्ताजी मेहत्रे यांनी केले तर आभार डॉ.अर्जुन सिंग ठाकूर यांनी मानले.



यशस्वी विद्यार्थ्यांनी गायत्री पांचाळ यांना प्रमाणपत्र देताना श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारणी सदस्य पांडुरंग पावडे, नायब तहसीलदार स्वप्निल जगताप, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ. आर.बी. कोटलवार, राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ.दत्ताजी मेहत्रे



यशस्वी विद्यार्थ्यां शिवा वाघमारे यांना प्रमाणपत्र देताना श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारणी सदस्य पांडुरंग पावडे, नायब तहसीलदार स्वप्निल जगताप, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉ. आर.बी. कोटलवार, राज्यशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ.दत्ताजी मेहत्रे

२. भारतीय राज्यघटनेवर मान्यवरांचे व्याख्यान.

दिनांक १८ मार्च २०२५ रोजी दुपारी २.०० वा. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.टी. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली ‘राज्यघटनेचे महत्त्व’ या विषयावर व्याख्यान

कार्यक्रम आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. दत्ताजी मेहत्रे हे उपस्थित होते.

अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य डॉ. ए.टी. शिंदे म्हणाले राज्यघटना ही भारतीया साठी गौरव ग्रंथ आहे. जनसामान्यांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रचंड मेहनत घेऊन ही राज्यघटना लिहिली. या राज्यघटनेच्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांना ज्ञान अवगत असलं पाहिजे. राज्यघटनेचे वाचन विद्यार्थ्यांनी केलं पाहिजे असे प्रतिपादन केले. राज्यशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख प्राध्यापक डॉक्टर दत्ताजी म्हेत्रे यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये राज्यघटनेतील विविध कलमांची सविस्तर माहिती दिली प्रवेशिकेचा अर्थ समजावून सांगितला आणि आपण या राज्यघटनेमुळे भारतात गुण्यागोविंदाने राहतो असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. विजयसिंह ठाकूर यांनी केले. सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. श्याम मोकले यांनी मानले.



महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.टी. शिंदे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना यावेळी व्यासपीठावर प्रा. डॉ. दत्ताजी मेहत्रे उपस्थित होते.

३. भारतीय राज्यघटना जनजागृती – भित्तीपत्रक

दिनांक १९ मार्च २०२५ रोजी दुपारी १२.०० वा. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.टी. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली 'राज्यघटनेची माहिती ' या विषयावर भित्तीपत्रकाचे आयोजित करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. मयूर दरबेसवार, प्रा. डॉ. श्याम मोकले, प्रा. डॉ. मारोती देशमुख, प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. दत्ताजी मेहत्रे हे उपस्थित होते.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.टी. शिंदे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. भित्तिपत्रकाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अद्ययावत ज्ञान मिळते. भित्तिपत्रकाचा उपयोग विद्यार्थ्यांना होतो असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार यांनी केले. आभार प्रा. डॉ. मारोती देशमुख यांनी मानले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेची विद्यार्थिनी समृद्धी हमंद यांनी प्रेझेंटेशन केले.



भित्तिपत्रकाचे विमोचन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.टी. शिंदे

४. भारतीय राज्यघटनेवर निबंध स्पर्धा

दिनांक २० मार्च २०२५ रोजी दुपारी १२.०० वा. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.टी. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली 'राज्यघटनेचे ७५ वर्षे' या विषयावर निबंध स्पर्धेचे आयोजिन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील प्रा. डॉ. मयूर दरबेसवार, प्रा. डॉ. श्याम मोकले, प्रा. डॉ. मारोती देशमुख, प्रा. बालाजी जाधव प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. दत्ताजी मेहेत्रे, प्रभारी क्रीडा संचालक प्रा. डॉ. अर्जुनसिंह ठाकूर, प्रा. डॉ. विजयसिंह ठाकूर, प्रा. डॉ. माधव बसवंते, प्रा. डॉ. राजू कोंडेकर,प्रा. प्रकाश कोथळे,प्रा. डॉ. मयूर दरवेसवार, प्रा. डॉ. मोकले श्याम,प्रा. डॉ.राहूल खडे, प्रा. डॉ. सतिष उमाटे,प्रा. भुयारे सदाशिव ,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार प्रा. सुलोचना माळवे,प्रा. सुनील कदम, प्रा. डॉ. मारोती देशमुख, प्रा. बालाजी जाधव, प्रा. डॉ. ज्योती मुंगल, प्रा. डॉ. करंजकर,श्री, अंकुश डोंगरे, डि.के. डहाळे , डी.सी.इंगोले, यांनी प्रयत्न केले.



दैनिक सत्यप्रभा

गुरुवार, दि.१३ मार्च २०२५

# आपला जिल्हा

# वार्षिक स्नेहसंमेलन म्हणजे आयुष्यभर साठवून ठेवायच्या आठवणी

## पांडुरंगराव पावडे यांचे प्रतिपादन

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. दत्ता बडे, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भूगोल विभागातील प्रा. डॉ. ... तर आभार क्रीडा संचालक डॉ. अर्जुनसिंह ठाकूर यांनी मानले.

वार्षिक संमेलन यशस्वी करण्यासाठी डॉ. विजयसिंह ठाकूर, प्रा. प्रकाश कोपडे, डॉ. उत्तम जाधव, डॉ. आर एम कोडक, प्रा. सदाशिव भुस्से, डॉ. आर पी भावले, डॉ. माधव बसवले, डॉ. सतीश आटे, प्रा. डॉ. मधुर दरवेसकर, प्रा. डॉ. मोकले स्वाम, ...

## 'रंग चेहऱ्यांचे' छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन

## जात पडताळणी समितीमार्फत सोमवारी विशेष मोहिम शिबिराचे आयोजन

# राजीव गांधी महाविद्यालयात सेवा हक्क दिवस साजरा

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथे राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि तहसील कार्यालय, मुदखेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'सेवा हक्क दिवस' सोमवार २८ एप्रिल २०२४ रोजी साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.टी. शिंदे होते. प्रमुख वक्ते म्हणून मुदखेड येथील तहसीलदार श्री आनंद देऊळगावकर होते यावेळी विचार पिठावर श्री जगताप,श्री माने, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर.बी. कोटलवार होते.

यावेळी बोलताना अतुल देऊळगावकर म्हणाले महाराष्ट्र शासनाने दिनांक 1 एप्रिल, 2025 रोजी'28 एप्रिल' हा दिवस महाराष्ट्र राज्याच्या जनतेसाठी तसेच सर्व शासकीय अधिकारी कर्मचा-यांसाठी सेवा हक्क दिन ( Seva Hakka Din ) म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे.10 वर्षांपूर्वी म्हणजे दिनांक 28 एप्रिल,2015 रोजी महाराष्ट्र शासनाने विशेष करुन तत्कालीन मा.मुख्यमंत्री श्री देवेंद्रजी फडणविस यांनी पुढाकार घेऊन महाराष्ट्रातील जनतेला नियत कालमर्यादेच्या आत लोकसेवा प्राप्त करण्याचा हक्क देणारा 'महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम 2015' अंमलात आणला आहे.या बद्दलची सविस्तर माहिती सांगितली. यावेळी नायब तहसीलदार सुनील जगताप यांनी कायद्याने दिलेला हक्क याविषयी सविस्तर माहिती सांगितली.अध्यक्षीय समारोपामध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे म्हणाले शासनाची भूमिका ही जनतेचे कल्याण करणे . कोणतीही योजना जन कल्याणासाठी, जन उन्नतीसाठी असते असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. आर बी कोटलवार यांनी केले आभार क्रीडा संचालक डॉ. अर्जुनसिंह ठाकूर यांनी मांनले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील डि.के. डहाळे, मुकुंद डांगे, डि.सी. इंगोले इत्यादी कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली.



मुदखेड तालुक्याचे तहसीलदार मा. आनंद देऊळगावकर यांचे स्वागत करताना महाविद्यालयाची प्राचार्य डॉ.ए.टी.




प्राचार्य डॉ.ए.टी. शिंदे यांचे स्वागत करताना प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. उत्तम जायभाये

शिंदे





मुदखेड तालुक्याचे नायब तहसीलदार मा. स्वप्निल जगताप यांचे स्वागत करताना प्राचार्य डॉ.ए.टी शिंदे

तहसील कार्यालयातील कर्मचारी प्रताप माने यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. टी. शिंदे






मानवी हक्क दिन निमित्ताने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुदखेड तालुक्याचे तहसीलदार माननीय आनंद देऊळगावकर यावेळी विचारपिठावर नायब तहसीलदार स्वप्निल जगताप, प्राचार्य डॉ. ए.टी. शिंदे, कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार






विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुदखेड तालुक्याचे नायब तहसीलदार मा. स्वप्निल जगताप







मार्गदर्शन करताना महाविद्यालयाची प्राचार्य डॉ.ए.टी

कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार



डॉ. आर. बी. कोटलवार

कार्यक्रम अधिकारी, रा. से. यो.

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड जि. नांदेड

डॉ.ए. टी. शिंदे

प्राचार्य

PRINCIPAL
Rajiv Gandhi Mah
Mudkhed




श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड जिल्हा नांदेड

**Accredited by NAAC with 'B' Grade**

Email.Id- principalrgm169@gmail.com Telephone No. (02462) 275868 Mobile .No-9422559150

Reg.No. NGC2001/NMV/(01/2001)M.S. Dt.29 June 2001.


# राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिर अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२४-२५

## 'Youth for My Bharat' and 'Youth for Digital Literacy'

## विशेष शिबीर

## डोंगरगाव ता. मुदखेड जिल्हा नांदेड

( दि. ०२ जानेवारी २०२५ ते दि.०८ जानेवारी २०२५)


मार्गदर्शन

प्र.प्राचार्य डॉ. माधव बसवंते

राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड

प्रा.डॉ.आर.बी. कोटलवार

कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना

राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड




2 जानेवारी 2025



राष्ट्रीय सेवा योजनेची आज बैठक पार पडली महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि सूचना केल्या.




श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिरासाठी प्रभारी प्राचार्य डॉ माधव बसवंते यांच्या मार्गदर्शनाखाली डोंगरगाव कडे रवाना.....

3 जानेवारी 2025




**श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिराची सुरुवात वृक्ष दिंडीने केली. यावेळेस कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार, मुख्याध्यापक देशमुख गावातील नागरिक संदीप पुयड, विद्यार्थी इत्यादी.**

## राजीव गांधी महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबिराचे शानदार उदघाटन..

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर डोंगरगाव तालुका मुदखेड या ठिकाणी आज उदघटन कार्यक्रम संपन्न झाला कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारणी सदस्य तथा सिनेट सदस्य स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ माननीय नरेंद्रदादा चव्हाण होते तर उदघाटक म्हणून संचालक, राष्ट्रीय सेवा योजना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड मा. प्रा. डॉ. मल्लिकार्जुन करजगी प्रमुख वक्ते म्हणून योगानंद स्वामी महाविद्यालयाचे प्रा. डॉ. शशिकांत तुळमारे हे होते. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती

सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमापूजनाने झाली. यावेळी नरेंद्र दादाने आपल्या खास शैलीत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी विविध कौशल्य आत्मसात करून येणाऱ्या आव्हानासाठी सुसज्ज व्हावे असे प्रतिपादन केले. उद्घाटकीय भाषणात करजगी यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामविकास, डिजिटल लिटरसी, शोष खड्डे, बालविवाह प्रतिबंध अशा विविध समाज उपयोगी कार्यातून भारत घडतो असे प्रतिपादन केले. प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. तोळमारे यांनी आपल्या दमदार शैलीमध्ये विद्यार्थ्यांची मने जिंकून घेतली. विद्यार्थी मन आणि मनगट या शक्तीचा उपयोग करून भारत समृद्ध करावा असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार ,कार्यक्रमाचे आभार सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. मयूर दरबेसवार , कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. बालाजी जाधव यांनी केले.

या कार्यक्रमास डोंगरगाव चे उपसरपंच संजय सावंत ,जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री.व्ही. एम. देशमुख,प्रा. डॉ. अर्जुनसिंह ठाकूर, प्रा. सुलोचना माळवे, प्रा. डॉ. शिवराज कदम, कार्यालय प्रमुख श्री अंकुश डोंगरे, महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी गावातील मंडळी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**वार्षिक विशेष शिबिराची उद्घाटन सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने केली. यावेळी कार्यकारणी सदस्य तथा विद्यापीठ सिनेट सदस्य नरेंद्र दादा चव्हाण डॉ. शशिकांत तोळमारे, डॉ. करजगी, गावातील नागरिक इत्यादी.**



सिनेट सदस्य तथा कार्यकारणी सदस्य नरेंद्र दादा चव्हाण यांचे स्वागत करताना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर.बी.कोटलवार



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सिनेट सदस्य तथा कार्यकारणी सदस्य नरेंद्र दादा चव्हाण



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा. डॉक्टर शशिकांत तुळमारे यावेळी व्यासपीठावर नरेंद्र दादा चव्हाण डॉक्टर मल्लिकार्जुन करजगी इत्यादी



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संचालक राष्ट्रीय सेवा योजना विभाग स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ डॉ. मल्लिकार्जुन करजगी



सावित्रीच्या वेशभूषेत लहान चिमुकले विद्यार्थ्यांनी आणि मान्यवर

दिवस 4 जानेवारी 2025

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांच्या मार्गदर्शनाखाली डोंगरगाव येथे संपन्न होत असून सकाळी कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर.बी. कोटलवार यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ६.०० वा.योगा पासून दिवसाची सुरुवात करण्यात आली.





गुरांची तपासणी करताना डॉ. एस.एस. बंडेवार आणि त्यांचे सहकारी गावकरी मंडळी




गुरांची तपासणी करताना डॉ. एस.एस.बंडेवार, जि.प.पशु वैद्यकीय दवाखाना बारड मुदखेड आणि त्यांचे सहकारी गावकरी मंडळी

उद्‌बोधन सत्रात मार्गदर्शन



1 उद्‌बोधन सत्रात विद्‌यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ.नागनाथ अडकीणे कै.बाबासाहेब गोरठेकर महाविद्यालय,उमर



आजच्या  उदबोधन सत्रात कायदेतज्ञ अड. गुजरवाड कायदेविषयक सविस्तर माहिती सांगितली . या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. प्रकाश कोथळे  होते. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वयंसेवक ज्ञानेश्वर राहिरे , सूत्रसंचालन स्वयंसेवक  शिवा वाघमारे आभार स्वयंसेवक शिवकुमार व्हंडे, यांनी मानले.




**उदबोधन सत्रात कायदेतज्ञ अड. गुजरवाड कायदेविषयक सविस्तर माहिती सांगितली . या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. प्रकाश कोथळे  होते.**

विद्यार्थ्यांनी सकाळी श्रमदान केले. यामध्ये शाळेचा परिसर स्वच्छ केला. जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री व्ही एम देशमुख यांनी समाधान व्यक्त केले. यामध्ये प्रामुख्याने श्री श्रीकांत संतोष गणरस, अनिकेत कळणे, मंगेश पवार, शिवकुमार वंजे, वेदांत भोसकर, सुजल सूर्यवंशी, ज्ञानेश्वर राहिरे इत्यादींनी विशेष मेहनत घेतली यावेळी गावातील संजय पुयड कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार,प्रा. डॉ. व्ही. सी. ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमदान केले.



ग्राम स्वच्छता करताना विद्यार्थी गावचे सरपंच शिवानंद पांडुरंग पुयड कार्यक्रमाधिकारी डॉ. कोटलवार आर .बी.





सर्व रोग निदान शिबिराप्रसंगी उपस्थित मा.डॉ.वैशाली कुऱ्हाडे  वैद्यकीय आधिकारी , डोंगरगाव तज्ञ डॉक्टर मंडळी आणि विद्यार्थी





उद्बोधन सत्रात विद्यार्थ्याला मार्गदर्शन करण्यासाठी आलेले प्रा. डॉ. दत्ताजी मेहत्रे, प्रा. डॉ. श्याम मोकले










भोजन करताना शिबिरार्थी विद्यार्थी प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी







विद्यार्थ्यांनी सकाळी श्रमदान केले. यामध्ये शाळेचा परिसर स्वच्छ केला. जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक श्री व्ही एम देशमुख यांनी समाधान व्यक्त केले. यामध्ये प्रामुख्याने श्री

श्रीकांत संतोष गणरस, अनिकेत कळणे, मंगेश पवार, शिवकुमार वंजे, वेदांत भोसकर, सुजल सूर्यवंशी, ज्ञानेश्वर राहिरे इत्यादींनी विशेष मेहनत घेतली यावेळी गावातील संजय पुयड कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार,प्रा. डॉ. व्ही. सी. ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रमदान केले.

राजीव गांधी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजने शिबिर संपन्न

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित राजीव गांधी महाविद्यालय मुदखेड राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिराचा समारोप डोंगरगाव येथे झाला कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटीचे सहसचिव प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर होते प्रमुख वक्ते म्हणून प्रणाद जोशी ,प्रा. डॉ. भोपाळकर ,कार्यकारणी सदस्य पांडुरंग पावडे साहेब हे उपस्थित होते. यावेळी व्यासपीठावर प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार ,सहकार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. विजय ठाकुर हे उपस्थित होते.

अध्यक्ष समारोपामध्ये प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर यांनी गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांना केलेल्या मदतीबद्दल संस्थेच्या वतीने आभार मानले आणि विद्यार्थ्यांनी केलेल्या विविध कामाचे कौतुक केले. यावेळी प्रमुख वक्ते डॉ. प्रणाद जोशी यांनी युवकांचे मानसिक आरोग्य या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी पांडुरंगराव पावडे साहेब आणि प्रा. उत्तम भोपाळकर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रभारी प्राचार्य डॉक्टर माधव बसवंते यांनी शिबीर हे विद्यार्थ्यांसाठी भविष्य घडवण्याची संधी असते असे प्रतिपादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार सूत्रसंचालन प्रा. डॉ. विजय ठाकूर,आभार प्रा. डॉ. शिवराज कदम यांनी मानले.

## समारोप कार्यक्रमाचे छायाचित्रे




माजी प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर, सहसचिव, श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी यांचे स्वागत करताना महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते




मा. पांडुरंग पावडे, कार्यकारणी सदस्य, श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी नांदेड यांचे स्वागत करताना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार




प्रा. डॉ. उत्तम भोपाळकर यांचे स्वागत करताना प्रा. डॉ. शिवराज कदम




प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांचे स्वागत करताना सह कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ विजयसिंह ठाकूर






शिबिरार्थी विद्यार्थी, गावकऱ्यांना मार्गदर्शन करताना प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते



आपले अनुभव कथन करताना शिबिरार्थी विद्यार्थी श्री वंजे



आपले अनुभव कथन करताना शिबिरार्थी विद्यार्थी



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.डॉ. उत्तम भोपाळकर



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मुख्याध्यापक श्री देशमुख



सात दिवसाचा अहवाल सादर करताना कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक डॉक्टर आर बी कोटलवार



विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मानसिक आरोग्य तज्ञ डॉ. प्रनाद जोशी




आपला कार्यकाळ यशस्वीपणे राबवला म्हणून संस्थेच्या वतीने प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांचे पुष्पहार घालून अभिनंदन केले.




शिबिर यशस्वी केले म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ. माधव बसवंते यांनी प्रा. डॉ. आर. बी. कोटलवार, कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांचे पुष्पहार घालून अभिनंदन केले.





मार्गदर्शन करताना मा. प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर, सहसचिव श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी नांदेड







श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी नांदेड संचलित

# राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड जि. नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड संलग्नित.

(नॅक मूल्यांकन 'ब' दर्जा प्राप्त)

## राष्ट्रीय सेवा योजना (शैक्षणिक वर्ष २०२४-२५)

'Youth for My Bharat' and 'Youth For Digital Literacy'

विशेष शिबीर

डोंगरगाव ता. मुदखेड जिल्हा नांदेड

दि. २ जानेवारी २०२५ ते ०८ जानेवारी २०२५

:: उद्घाटन कार्यक्रम ::

शुक्रवार दि.०३ जानेवारी २०२५ स.११.०० वा

अध्यक्ष : मा. नरेंद्र चव्हाण उपाध्यक्ष भा.व.स.सा.का.तथा सिनेट सदस्य, स्वा.रा.ती.म.वि. नांदेड, व कार्यकारिणी सदस्य, श्री शा.भ.ए.सो. नांदेड

उद्घाटक : मा.प्रा.डॉ. मल्लिकार्जुन करजगी संचालक, रा.से.यो.

प्र. वक्ते : मा.प्रा.डॉ.शशिकांत तोळमारे योगानंद स्वामी महा. वसमत

प्रमुख अतिथी : मा. श्री शिवानंद पांडुरंग पुयड, सरपंच, डोंगरगाव

मा.प्रा.डॉ. अमोल काळे समन्वयक, नांदेड जिल्हा रा.से.यो.

मा. संजय तुकाराम सावंत उपसरपंच, डोंगरगांव

मा.डॉ. माधव बसवंते प्र. प्राचार्य, राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड

:: समारोप कार्यक्रम ::

बुधवार दि. ०८ जानेवारी २०२५ स. ११.०० वा.

अध्यक्ष : मा.प्राचार्य डॉ. रावसाहेब शेंदारकर सहसचिव, श्री शा.भ.ए.सो.नांदेड

प्रमुख अतिथी : श्री पांडुरंग पावडे कार्यकारिणी सदस्य, श्री शा.भ.ए.सो.नांदेड

प्रमुख वक्ते : डॉ. प्रणाद जोशी मानसिक आरोग्य तज्ञ

विषय: युवकांचे मानसिक आरोग्य

प्रा. उत्तमराव भोपाळकर सेवानिवृत्त प्राध्यापक

मा.डॉ. वैशाली कुऱ्हाडे वैद्यकीय अधिकारी, डोंगरगाव

श्री.व्ही.एम. देशमुख मुख्याध्यापक जि.प.प्रा.शाळा, डोंगरगाव

मा.डॉ. माधव बसवंते प्र. प्राचार्य, राजीव गांधी महाविद्यालय, मुदखेड.

:: आपले विनीत ::

डॉ. मयुर दरबेसवार
सहा. कार्यक्रम अधिकारी, रा.से.यो.

डॉ. विजयसिंह ठाकूर
सह कार्यक्रम अधिकारी, रा.से.यो.

डॉ. राजेश्वर कोटलवार
कार्यक्रम अधिकारी, रा.से.यो.

डॉ. माधव बसवंते
प्रभारी प्राचार्य